Kind attention to Smt. Y. R. Chiddarwar, Hon'ble President, Addl. Dist. Consumer, Nagpur.

(1)

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या नागपूर येथे सर्किट बेंचसाठी १० पदे व २ सदस्यांची पदे मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
शासन निर्णय, क्रमांक :- ग्रासंक १००२/ २१७३/ प्र.क्र.२८१८/ ग्रासं.३,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २१ ऑक्टोबर, २००४.

वाचा :- अध्यक्ष, राज्य आयोग यांचे क्रमांक :- पीए/ २००२, दिनांक ३० नोव्हेंबर, २००२ चे पत्र.

**शासन निर्णय :-**

केंद्र शासनाने वर्ष २००२ मध्ये ग्राहक संरक्षण कायदयात सुधारणा करुन सुधारीत ग्राहक संरक्षण कायदा मार्च, २००३ पासून अंमलात आणलेला आहे. ग्राहक संरक्षण कायदयात ज्या अन्य काही सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग मुख्यालया व्यतिरिक्त राज्यात शासन निर्धारीत करेल, त्या ठिकाणी परिक्रमा खंडपीठ ( Corcuit Benches) स्थापन करण्याची तरतूद ही सुधारीत कायदयात अंतर्भूत आहे. या कायदयातील कलम १७ बी नुसार राज्य आयोगाचे सर्किट बेंच मुंबई मुख्यालयाव्यतिरिक्त नागपूर येथे स्थापन करण्याची आवश्यकता आहे. या सर्किट बेंचसाठी पदे निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे नागपूर येथील सर्किट बेंचसाठी १० नवीन पदे व २ अतिरिक्त सदस्यांची पदे निर्माण करावयाच्या प्रस्तावाला उच्चस्तर सचिव समितीने मान्यता दिली आहे. त्यानुसार सोबत जोडलेल्या परिशिष्टात दर्शविलेली १० कर्मचाऱ्यांची व २ सदस्यांची अशी एकूण १२ पदे निर्माण करण्यास शासन याद्वारे मंजूरी देत आहे.

३. परिशिष्टातील कर्मचाऱ्यांची १० पदे ही नियंत्रक, वैधमापन शास्त्र, मुंबई यांच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात येत असून, सदर मंजूर पदांपैकी वर्ग - ३ व वर्ग ४ ची पदे केवळ कंत्राटी पध्दतीने भरण्यात यावीत.

४. याबाबतचा होणारा खर्च मागणी क्रमांक एम - २, " २४०८ अन्न साठवण व वखार साठवण - ०१ - अन्न - १०१ - प्रापण व पुरवठा (चार) ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ अंतर्गत राज्य परिषद, राज्य आयोग आणि जिल्हा मंचाची स्थापना (ए) मुफसल (२४०८ ०२६२) ०१ वेतनावरील खर्च " या लेखाशिर्षाखाली दर्शविण्यात यावा व सन २००४ -- २००५ या आर्थिक वर्षासाठी मंजूर केलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

D:\2818 -letter